
# ८. अपार प्रेम






एका सरोवराकाठी घनदाट जंगल होते. पशुपक्षी, झाडेझुडपे, डोंगरदऱ्या, कडेकपाऱ्या, ओढे-नाले यांनी वेढलेले हे जंगल होते. गुहा, घरटी, बिळे, वारूळ आणि जाळी अशी सर्व पशुपक्ष्यांची घरे या जंगलात होती. या जंगलातील सरोवर नेहमी कमळांनी फुललेले असायचे, म्हणून या जंगलाचे नाव पडले-कमळबन.

कमळबनात एक कुटुंब राहत होते. हरिण, हरिणी आणि त्यांची दोन पाडसे असे ते सुखी कुटुंब होते. पाडसे खूप खेळायची. एकमेकांना सोडून कुठेही जात नसायची. त्यांना एकमेकांबद्दल खूप जिव्हाळा होता.

एकदा हे कुटुंब सरोवराकाठी पाणी प्यायला निघाले. पाडसे आनंदाने गाणी गात, खेळत, बागडत निघाली होती. त्यांच्यात सावधपणा होता अन् मनात जंगली पशूंची भीती होती. तेवढ्यात त्यांना एका मोठ्या झाडाच्या मागून दोन डोळे चमकताना दिसले. झाडाच्या मागे वाघ उभा होता. कुटुंबाला कळून चुकले, की आता चौघांपैकी एकाला मरावे लागणार.

हरिणी म्हणाली, ''तुम्ही तिघे इथून जा. मी मागून येते.''

हरिण म्हणाले, ''नको, नको, तुम्ही तिघे जा. मी मागे राहतो.''

एक पाडस म्हणाले, ''नको, नको तुम्ही सगळे निघून जा. मी मागे राहतो, म्हणजे तुमचं एखादं बाळ तरी वाचेल.''

वाघाने त्यांचं संभाषण ऐकलं. तो समोर आला. हरिणीचे कुटुंब थरथर कापायला लागले. वाघ म्हणाला, ''घाबरू नका, मी तुम्हांला अभय देत आहे. तुम्ही एकमेकांवर किती प्रेम करता! सगळ्यांच्या हृदयात एकमेकांसाठी त्याग करण्याची भावना आहे. एकमेकांविषयी अपार प्रेम आहे. अशा कुटुंबाला कोणाचं भय नसतं. तुम्ही जा, सुखी राहा.'' असे म्हणून वाघ निघून गेला.



**– शुभदा सुरंगे**

**शब्दार्थ :** **जाळी** – वेलींच्या फांद्या एकत्र येऊन बनलेली. **जिव्हाळा**– प्रेम. **जंगली** – जंगलात राहणारे. **अभय देणे** – निर्भयतेची खात्री देणे. **त्याग करणे**– सोडून देणे. **अपार**– खूप, प्रचंड.

## स्वाध्याय



**प्र. १. एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) जंगलाचे नाव ‘कमळबन’ असे का पडले ?

(आ) हरिणाच्या कुटुंबात कोण कोण राहत होते ?

(इ) हरिणाच्या कुटुंबाच्या मनात कोणते विचार होते ?

(ई) वाघ शिकार न करताच का निघून गेला ?

**प्र. २. ‘पशुपक्षी’, ‘झाडेझुडपे’ यांसारखे जोडशब्द पाठात आले आहेत ते शोधा व लिहा.**

**प्र. ३. कोण कोठे राहतात ? शोधा व लिहा.**

| वाघ | पक्षी | उंदीर | साप | माकड | मधमाशी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**प्र. ४. कोण, कोणाला म्हणाले.**

(१) “तुम्ही तिघे इथून जा.”

(२) “नको, नको तुम्ही तिघे जा”

(३) “नको, नको तुम्ही सगळे निघून जा”

(४) “मी तुम्हांला अभय देत आहे.”

**प्र. ५. या पाठातील दोन्ही चित्रांचे वर्णन करा व वर्गात सांगा.**

**प्र. ६. ‘जंगल’ या शब्दाची खाली दिलेली रूपे वाचा. खालील दिलेल्या शब्दांची अशी रूपे तयार करा.**

उदा., जंगल – जंगलाचा, जंगलात, जंगलाला, जंगलासाठी, जंगलापासून, जंगलातून, जंगली, जंगलाचे, जंगलाच्या.

| सरोवर | आनंद | कुटुंब | झाड |
|---|---|---|---|

**प्र. ७. खालील शब्दांचे तो, ती, ते लावून लिंग ओळखा.**

(१) जीभ (२) चिंच (३) वाघ (४) कुटुंब

(५) पाणी (६) गुहा (७) पाडस (८) हरिणी

**प्र. ८. खालील शब्दांचे वचन ओळखा व लिहा.**

(१) ओढे (२) नाले (३) पाडसे

(४) वाघ (५) जंगल (६) बाळ

**प्र. ९. हरणाच्या पिलाला ‘पाडस’ म्हणतात. खालील प्राण्यांच्या पिलांना काय म्हणतात ते लिहा.**

(१) वाघ –

(२) मांजर –

(३) सिंह –

(४) शेळी –

(५) गाय –

(६) घोडा –

**प्र. १०. खालील शब्द दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी घाला.**

(सरोवराचे, अपार, अभय, हृदयात)

(१) बलाढ्य सिंह जेव्हा ......... देतो, तेव्हा आश्चर्य वाटते.

(२) आपल्या देशावर ......... श्रद्धा असावी.

(३) ......... निळेशार पाणी चमकत होते.

(४) त्याग करण्याची भावना ......... असावी लागते.

**प्र. ११. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(१) तुमच्या कुटुंबात किती माणसे आहेत?


(२) तुमचे तुमच्या भावंडांवर प्रेम आहे का?

(३) तुम्ही तुमच्या भावंडांसाठी काय करता?

**प्र. १२. तुम्ही भावंडासाठी एखाद्या गोष्टीचा त्याग केला, असा एखादा प्रसंग थोडक्यात सांगा.**

- **खालील गोलातील शब्दांना शेजारच्या माळेतील योग्य मणी लावा. नवीन शब्द तयार करा.**

**उदा., माया – मायाळू**




- **वाचा.**

कुंभकोणम् येथील एका पाठशाळेतील वर्गात गणिताचा तास चाललेला होता. वर्गशिक्षक गणिताचा सिद्‌धांत मुलांना समजावून सांगत होते. 'एखाद्या संख्येला त्याच संख्येने भागले असता भागाकार नेहमी एक येतो', ते म्हणाले. साऱ्या मुलांनी तो सिद्‌धांत आपल्या वह्यांमध्ये टिपून घेतला नि काहींनी तर तो मनातल्या मनात पाठही करून टाकला. तेवढ्यात एक लहानसा मुलगा ताडकन उभा राहिला आणि वर्गशिक्षकांना म्हणाला, ''गुरुजी, तुमचा हा सिद्‌धांत थोडासा चुकीचा आहे.'' शिक्षकांनी आपल्या चष्म्याच्या जाड भिंगातून त्या मुलाकडे पाहिले. त्यांचा चेहरा विलक्षण गंभीर झाला. ते काहीशा करड्या आवाजात म्हणाले, ''तुझं म्हणणं स्पष्ट करून सांग पाहू.'' यावर तो मुलगा खड्या आवाजात धीटपणे म्हणाला, ''सर, शून्याला भागले तर?'' त्या चिमुरड्या मुलाचा हा प्रश्न ऐकताच त्या शिक्षकांना त्याच्या बुद्‌धिमत्तेचे विलक्षण आश्चर्य वाटले. हा मुलगा म्हणजेच पुढे श्रेष्ठ गणिती तज्ज्ञ म्हणून प्रसिद्‌ध झालेले श्रीनिवास रामानुजन होय!

**शिक्षकांसाठी :** वाचनासाठी दिलेल्या परिच्छेदाचे विद्यार्थ्यांकडून अनुलेखन व श्रुतलेखन करून घ्यावे.